**नियमित दिवाणी दावा क्र.१०८/२०१९**

## निशाणी २२ खालील आदेश

प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा प्रतिवादी क्र.१, ३, ५ व १० यांनी त्यांच्याविरुध्द दि.१९.११.२०२१ रोजी पारित केलेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द करुन मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यांना दाव्याची नोटीस प्राप्त झाल्यानंतर कैफियत दाखल करण्याकरीता आवश्यक कागदपत्रांची माहिती व ती कागदपत्रे कोणत्या शासकीय कार्यालयात उपलब्ध होतील याबाबत कल्पना नव्हती. त्यामुळे आवश्यक कागदपत्रांच्या नकला त्वरीत मिळविणे त्यांना शक्य झाले नव्हते. तसेच कोव्हीड–१९ च्या महामारीमध्ये दि.२३.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२२ हा कालावधी मुदतीच्या कायद्यामधून वगळण्यात आला. सदर कालावधीत लॉकडाऊन असल्याने शासकीय कार्यालयामधून नकला उपलब्ध करणे शक्य झाले नव्हते. लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर सुध्दा पुढील सहा ते सात महिने शासकीय कार्यालयाचे कामकाज सुरळीत चालु नव्हते. त्यामुळे सुध्दा कागदपत्रे मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या. तद्नंतर दि.१४.१०.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.३ निलेश प्रदिप चव्हाण यांचे तर दि.०५.०४.२०२३ रोजी शंकर गणपत चव्हाण यांचे व दि.१९.०८.२०२३ रोजी राजाराम गणपत चव्हाण यांचे निधन झाले. प्रतिवादी राजाराम चव्हाण यांना वेळोवेळी त्यांच्या आजारपणामुळे उपचाराकरीता ऑस्कर हॉस्पीटल येथे न्यावे लागत होते व उपचारादरम्यान त्यांचेसुध्दा निधन झाले. त्यांच्या आजारपणात प्रतिवादी यांची आर्थिक ओढाताण झाली. सदर कारणांमुळे सुध्दा प्रतिवादी यांना त्यांच्या वकीलांची भेट घेणे व शासकीय कार्यालयातुन कागदपत्रे गोळा करणे शक्य झाले नाही.

०३. प्रतिवादी यांचे असेही कथन आहे की, पतीच्या निधनामुळे प्रतिवादी क्र.१० यांना मानसिक धक्का बसलेला होता व त्या वयोवृध्द असल्यामुळे त्यांना वारंवार वैद्यकीय उपचार घेणे गरजेचे असते. त्यामुळे सुध्दा प्रतिवादींना कागदपत्रे जमविणे शक्य झाले नव्हते. एकंदरीत, वरील कारणांमुळे मुदतीमध्ये प्रतिवादींना कैफियत दाखल करता आली नाही. त्यांच्याविरुध्द विनाकैफितचा आदेश रद्द न झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. पुढे असेही कथन आहे की, ते केवळ कैफियत दाखल करीत नसुन त्यासोबत प्रतिदावा सुध्दा दाखल करीत आहेत. दावा मिळकतीमध्ये त्यांचे पुर्वापार जुनी

घरे असून प्रतिदावा मिळकतीमधील नमुद क्षेत्र त्यांच्याच ताबे–कब्जात व वहिवाटीत आहे. प्रतिवादी हे त्या क्षेत्राचे विरुध्द कब्जाने मालक झाले असल्याबाबत घोषित करुन मिळावे अशी प्रतिदाव्यात मागणी केलेली आहे. कैफियत दाखल करण्यात प्रतिवादीकडून झालेला विलंब हा त्यांच्या निष्काळजीपणामुळे नसून कोव्हीड–१९ च्या महामारीचा कालावधी, कौटुंबिक अडचणी व कागदपत्रे मिळविण्यास झालेला विलंब यांचा समावेश आहे. सबब, प्रतिवादींनी प्रस्तुतचा दावा त्यांच्या कैफियतशिवाय चालविण्याबाबतचा केलेला आदेश रद्द करुन त्यांची कैफियत व प्रतिदावा दाखल करुन घेण्याची विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जावर वादी करीता विधीज्ञ श्री. दामले यांनी कोणताही आक्षेप न घेता जास्तीत जास्त कॉस्ट लावून सदर अर्ज मंजूर करण्यात यावा अशी भुमिका घेतली आहे.

०५. प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री. वडके यांनी युक्तिवाद केला की, सन २०२१ मध्ये प्रस्तुतचा दावा सदर प्रतिवादी यांच्या कैफियतशिवाय चालविण्याबाबत कोणताही आदेश पारित केलेला नाही. दावा मिळकतीच्या मोजणीमध्ये प्रतिवादीचे अतिक्रमण दाखविलेले आहे. सदर अतिक्रमित क्षेत्रामध्ये प्रतिवादी यांचा दिर्घकालीन ताबा असल्यामुळे त्या क्षेत्राचे ते विरुध्द कब्जाने मालक झाले आहेत. त्याच पार्श्वभुमीवर प्रतिवादी यांची कैफियत व प्रतिदावा दाखल करुन घेणे आवश्यक आहे. तसेच दरम्यानच्या काळात काही प्रतिवादी मयत झाले आहेत, तर प्रतिवादी क्र.३ यांना शारिरीक व्याधी असल्यामुळे मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. सबब, प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणांचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०६. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी विलंबाबाबत दिलेले स्पष्टीकरण विचारात घेतले. याबाबत काही दुमत नाही की, सन २०२०–२१ या कालखंडामध्ये कोव्हीड–१९ चा प्रादुर्भाव होता व दैनंदिन जीवन तसेच शासकीय व खाजगी कार्यालयाचे कामकाज प्रभावित झाले होते. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा दि.२३.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२२ हा कालावधी मुदतीच्या कायद्यामधून वगळण्याबाबत आदेश केला आहे. प्रतिवादीकडून दिलेले सदर कारण संयुक्तिक आहे. तसेच प्रतिवादी यांच्या कुटुंबामध्ये सन २०२३ मध्ये सहा महिन्याच्या कालावधीत तीन व्यक्तिंचे निधन झाले. त्यामुळे इतर सदस्यांना सदर दुःखद घटनेला सामोरे जावे लागले व त्या दुःखातून

सावरण्याला वेळ लागला ही बाब समजुन घेण्यासारखी आहे. तथापि, सन २०२४ च्या संपुर्ण वर्षात प्रतिवादी यांना न्यायालयासमक्ष येऊन सदर अर्ज करता आला असता. प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा प्रतिवादी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी सादर केला आहे. सन २०२४ पासून प्रस्तुत विचाराधीन अर्ज दाखल करेपर्यंत जो विलंब झाला आहे त्याबाबत प्रतिवादी यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. जर प्रतिवादी हे दावा मिळकतीवर आपला मालकी हक्क सांगत आहेत, तर त्यांच्याकडून एवढा दिर्घ विलंब अपेक्षित नाही. जरी प्रस्तुत अर्जाला वादी पक्षाकडून कुठलीही हरकत घेतली नसली तरी एवढ्या दिर्घ विलंबाबाबत योग्य व संयुक्तिक स्पष्टीकरण प्रतिवादी यांनी दिले आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियतसुध्दा सादर केलेली नाही. तसेच कोणती कागदपत्रे मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न करुन मिळविले त्या कागदपत्रांचा प्रस्तुत अर्जामध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही. प्रतिवादी यांचेच असे कथन आहे की, ते दावा मिळकतीचे विरुध्द कब्जाने मालक झाले आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादी यांना कायदेशीर बाबी माहित आहेत तरीदेखील त्यांना कागदपत्रांची माहिती नव्हती व ती कागदपत्रे कोणत्या शासकीय कार्यालयातून मिळू शकतील याची त्यांना माहिती नव्हती ही बाब पटण्यासारखी नाही. एकंदरीत, प्रतिवादी यांच्या कुटुंबातील तीन लोकांच्या निधनाची बाब वगळता पुढील विलंबाबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब, या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज हा फेटाळण्यास पात्र आहे. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज **निशाणी २२** फेटाळण्यात येतो.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.06 17:30:59 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी

**दिनांकः ०६.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.108/2019 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 06.03.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 06.03.2026 |